## Quadrant II – Notes

**Programme:** BA

**Subject:** Marathi

**Paper Code:** MRC-106

**Paper Title:** **Marathi Grammar (मराठी व्याकरण)**

**Unit:** भाषाशास्त्र आणि व्याकरण परस्परसंबंध

**Module Name:** मराठी व्याकरणाची परंपरा भाग- 2

**Module No:** 04

**Name of the Presenter: Dr. Geeta Yerlekar**

---

## Notes

<u>शास्त्रीय व्याकरणे (मराठीतच लिहिलेले व्याकरण)</u>

अव्वल इंग्रजी कालखंडापासून स्वतंत्रपणे व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न झाला असला तरी या कालखंडातील व्याकरण हे इंग्रजीत लिहिले गेले होते. मराठी भाषेत व्याकरण लिहिण्याचा प्रयत्न शास्त्रीय व्याकरणापासून झाला. मराठीतच लिहिल्या गेलेल्या व्याकरणाची परंपरा सांगता येते.

- ‘हैदशाळा मंडळी ’ या संस्थेमार्फत मराठीला आवश्यक असलेले शालेय पातळीवरील व्याकरण जॉर्ज जार्विस याने जगन्नाथशास्त्री क्रमवंत,रामचंद्रशास्त्री जान्हवेकर, बाळशास्त्री घगवे आणि गंगाधरशास्त्री फडके या पंडितांकडून १८२४ ला लिहून घेतले. शास्त्रीपंडितांनी मराठीच्या विद्यार्थीवर्गासाठी लिहिलेले मराठीतील हे पहिले व्याकरण होय. व्याकरणकार संस्कृतपंडित असल्याने हे व्याकरण संस्कृताध्ययनबलेंकरुन रचले गेले.

- मराठी व्याकरणावर इंग्रजी आणि संस्कृत याचा प्रभाव दिसत असला तरी संस्कृत व्याकरणापेक्षा इंग्रजी व्याकरणांचा प्रभाव अधिक दिसतो.

- १८२४ ला वेंकटमाधवांनी 'महाराष्ट्र प्रयोगचंद्रिका' हे मराठीचे व्याकरण संस्कृतमध्ये रचले. हे व्याकरण इंग्रजी व्याकरणाच्या प्रभावातून मुक्त आहे हा याचा विशेष तसेच बोलण्यातील मराठी भाषेला प्रमाण मानून हे व्याकरण रचले.

- १८३६ ला गंगाधरशास्त्री फडके 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' लिहिले. मराठीतील हे पहिले मुद्रितव्याकरण होय.

- १८३६ ला बाळशास्त्री जांभेकर यांनी मुलांसाठी बालव्याकरण लिहिले.

दादोबा पांडुरंग तर्खडकरः

- १८३६ ला 'मराठी भाषेचे व्याकरण' लिहिले. पुढच्या आवृत्त्यांवर 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' असे शीर्षक आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत तर्खडकर म्हणतात, 'आपल्या देशात व्याकरण कुणाला ठाऊक नाही. ते शिकले पाहिजे. जेणेकरुन परभाषा ग्रहण करता येईल.' मराठीचे एकच एक रुप लोकांसमोर ठेवावे या हेतूने लेखन झाले. व्याकरण हे एक शास्त्र कसे आहे हे सांगून यामुळे शुद्ध व अशुद्ध यांतील भेद कळतो. भाषेविषयीचे गैरसमज दूर होतात. व्याकरणामुळे भाषेचे नियम कळतात असे मत त्यांनी मांडले. प्रत्येक आवृत्तीत नवा विचार मांडण्याचा, संस्कृत व इंग्रजी या दोन भाषांच्या परिचयामुळे मराठीचे स्वरुप, तिची रचना जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मराठी व्याकरणाला एक निश्चित दिशा दाखविण्याचे कार्य तर्खडकरांनी केले. शालेय पातळीवर लघुव्याकरणही रचले. त्यांच्या या कार्यामुळेच 'मराठी भाषेचे पाणिनी' म्हणून त्यांना ओळखले जाते.

कृष्णशास्त्री चिपळूणकर

- दादोबांच्या व्याकरणातील उणिवा दाखविण्याच्या हेतूने कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी मराठी शाळापत्रकामधून व्याकरणविषयक जवळजवळ २५ लेख प्रकाशित केले. चिपळूणकरांनी आपल्या निबंधातून भाषा आणि व्याकरण याच्या संबंधावर प्रकाश टाकला. त्यांच्या या निबंधामुळे मराठी व्याकरणावरील इंग्रजीच्या प्रभावाला थोडाफार पायबंद बसला. व्याकरणविचार स्वतंत्रपणे करण्याची शक्यता निर्माण झाली. या विचारांच्या आधारे रा. भि. जोशी यांनी प्रौढबोध मराठी व्याकरण रचले. वर्णमाला, शब्दयोगी अव्यय, विभक्तीप्रत्यय याविषयीचा त्यांचा विचार मराठी व्याकरणाचे वेगळेपण शोधणारा आहे.

रा. भि. गुंजीकर

- रा. भि. जोशींच्या व्याकरणावर टिका करण्यासाठी रा. भि. गुंजीकर यांनी विविधविस्तारमध्ये व्याकरणविषयक लेख लिहिले. भाषेतील कोणत्याही रुपाला किंवा कोणत्याही प्रयोगाला अशुद्ध मानायला विरोध केला. संस्कृत परंपरा मराठीने पाळली असती तर त्यातील अनेक वादग्रस्त मुद्दे बाजूला झाले असते. चिपळूणकरांच्या विचारांशी जुळणारा विचार गुंजीकरांनी मांडला.

कृष्णाशास्त्री गोडबोले

-मराठीचे आदर्श व्याकरण तयार करण्याचा प्रयत्न १८६३ ला झाला. दक्षिणा प्राईझ कमिटी च्या वतीने इंग्रजीच्या धर्तीवर आदर्श व्याकरणासाठी देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार कृष्णाशास्त्री गोडबोले यांचे १८६७ मध्ये मराठी भाषेचे व्याकरण लिहिले. यात संस्कृत-प्राकृत या भाषांशी मराठीचा असलेला संबंध, प्राकृत भाषेचे संक्षिप्त व्याकरण, वाक्यविचार, पद्यविचार याचा विचार झालेला दिसतो. या व्याकरणाने मराठीच्या व्याकरणाकडे शोधकपणे पाहण्याची दृष्टी दिली.

गोपाळ गणेश आगरकरांनी, पाध्येशास्त्री, रावजी सदाशिवशास्त्री गोडबोले यांनी व्याकरण लिहिले.

मोरो केशव दामले

-आतापर्यंत मराठीची रचना समजून घेण्याचा प्रयत्न व्याकरणकार आपल्यापरीने करीत होते. मराठी व्याकरणाविषयी एक भूमिका घेणे गरजेचे होते. असा प्रयत्न मोरो केशव दामले १९११ शास्त्रीय मराठी व्याकरणाने केले. हा ग्रंथ मराठी व्याकरणाचा अग्रग्रंथ ठरला. वर्णविचार, शब्दविचार आणि वाक्यविचार याला महत्त्वाचे स्थान. व्याकरणविचार शास्त्रीय पातळीवर आपण्याचा प्रयत्न केला . मराठी व्याकरणाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम दामलेंनी केले. त्यांच्या या व्याकरणाने तर्कशुद्ध मांडणी मुळे विशिष्ट स्थान निर्माण केले. तसेच विशुद्ध व्याकरणाची संकल्पना त्यांच्या व्याकरणातून डोकावते. दामलेंपासून मराठी व्याकरणाचा नवा टप्पा आपल्याला सांगता येतो. १९५० पर्यंतच्या लेखनाचे प्रतिनिधित्व करणारा हा ग्रंथ ठरला.

-विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या तिगन्तविचार, सुबन्तविचार या लेखातून दामलेंच्या विचारातील सदोषता दाखवली. राजवाडे मराठीचे व्याकरण संस्कृत साच्यात बसविण्याचा प्रयत्न करतात.

या कालखंडात शालेय पातळीवरील, प्रौढांसाठी लिहिलेल्या व्याकरणाची रचना जरी इंग्रजी व्याकरणरचनेसारखी असली तरी त्यांचा उद्देश वेगळा आहे. ही व्याकरणे मराठीतून लिहिली. इंग्रजी व संस्कृत व्याकरणाची चौकट स्वीकारुन व्याकरण लेखन झाले. दादोबा, रा. भी.जोशी, दामले हे व्याकरणकार इंग्रजीचा आदर्श समोर ठेवून व्याकरण लिहिणारे आहेत, तर कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा. भि. गुंजीकर , वि.का. राजवाडे हे तिन्ही निबंधकार संस्कृतचे जाणकार असल्याने मराठीचे व्याकरण संस्कृत धर्तीवर रचण्याचा आग्रह धरणारे आहेत.

४. १९५० नंतर मराठी व्याकरण-लेखन

- १९५० पूर्वीच्या व्याकरणात व्याकरणाच्या बाहेरील गोष्टींचाही विचार व्याकरणात झालेला दिसतो. १९५० नंतरच्या काळात भाषाविज्ञानाने विकसित केलेल्या नव्या दृष्टीमुळे मराठी व्याकरणाला नव्या विचारांची दखल घ्यावी लागली.

- १९५२ मध्ये महादेव पांडुरंग सबनिस यांचे आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण प्रसिद्ध झाले. प्रस्तुत व्याकरणात सबनिसांनी दामलेंची मते खोडण्याचा प्रयत्न केला आहे. व्याकरण ही भाषाशास्त्राला प्रमाण मानली गेलेली संज्ञा भाषाशास्त्राच्या एका विषयापुरती सिमित आहे हा विचार सबनिसांनी मांडला. विभक्तीसंदर्भात त्यांनी स्वतंत्र विचार मांडला. त्यांच्या प्रयोगविचारामुळे वाक्यपृथक्करणाचे क्षेत्र व्याकरणातील प्रयोगापेक्षा कसे भिन्न आहे याची जाणीव निर्माण झाली. मात्र सबनिसांच्या या सगळयाच विचारांचा नंतरच्या व्याकरणात परामर्श त्यातील स्पष्टतेच्या अभावामुळे घेतला गेला नाही.

- सबनिसानंतर भाषाविषयक नव्या जाणिवांमुळे व्याकरणाच्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण झाले या पार्श्वभूमीवर अरविंद मंगरुळकर १९६५ मराठी व्याकरणाचा पुनर्विचार हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. या ग्रंथात प्रत्यक्ष व्याकरण व त्याचा पाया यासंदर्भातील विषयांचा परामर्श घेतला आहे. भाषा-व्याकरण संबंध, भाषेचे स्वरुप, मराठीची वर्णमाला,वर्णमालेच्या मर्यादा आणि अंतर्गत विसंगती, शब्दांचे वर्गीकरण, विभक्तीविषयक वाद, धातुविर्मश अशा घटकांची चर्चा केली आहे.

- १९६५ मध्ये ग.वा.करंदीकर संपा. शास्त्रीय मराठी व्याकरणाच्या आवृत्तीत नव्या भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून आजच्या मराठीचे स्वरुपदर्शन घडविणे ही भूमिका दिसते.

- १९६५ मध्ये ना.गो. कालेलकर यांच्या Marathi या इंग्रजी ग्रंथात मराठी वर्णमालेबद्दलचे विचार मांडले आहेत.

- प्रमाण मराठीचा अभ्यास (१९८३) या सुहासिनी लद्दू यांच्या ग्रंथात प्रमाणभाषा व बोलीभाषा यांच्या व्याकरणांतील फरक सांगितला आहे.

- मराठी व्याकरणः वाद आणि प्रवाद (१९८७) डॉ. कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर यांच्या ग्रंथात इंग्रजी व संस्कृत व्याकरणाच्या चौकटीत मराठी व्याकरणाचा जो प्रवास झाला त्यातून निर्माण झालेल्या समस्यांची चर्चा केलेली आहे. या ग्रंथात केलेली सुसंगत, सुस्पष्ट मांडणी महत्त्वाची ठरते. त्याचबरोबर मराठी व्याकरणावर प्रभाव टाकणारा ऐतिहासिक भाषाशास्त्रीय विचार आणि ध्वनीविचार याचा विचारही यात केला आहे.

- १९९० ला माधव आचार्य यांचा मराठी व्याकरण विवेक हा ग्रंथ

- १९९२ मध्ये दामले यांच्या व्याकरण कार्याचे स्मरण करुन देणारा मराठी व्याकरणाचा इतिहास हा ग्रंथ आला जवळजवळ पाऊणेदोनशे वर्षातील मराठी व्याकरणाचा इतिहास यात आला आहे.

-१९९४ लीला गोविलकर यांनी मराठी भाषेचे व्याकरणविशेष व्याकरणग्रंथातून कसे स्पष्ट होत आले या उद्देशातून मराठीचे व्याकरण हा ग्रंथ लिहिला.

- मराठीःघटना, रचना, परंपरा – डॉ. मंगरूळकर, डॉ. अर्जुनवाडकर (१९५८), मराठी व्याकरण- डॉ. प्र. न.जोशी (१९६३), मराठी व्याकरणाचे व्याकरण- डॉ.कृ. पां. कुलकर्णी(१९६५), मराठी व्याकरणः काही समस्या – डॉ. प्र. न. जोशी(१९७५), विजय इंगळे- मराठी भाषाः भाषाशास्त्र आणि व्याकरण (१९९९)

- अशातऱ्हेने मराठी व्याकरण परंपरा अव्वल इंग्रजी कालखंडापासून सांगता येते. व्याकरण लेखनाच्या प्रयोजनात भिन्नता असली तरी त्या - त्या काळाची मर्यादा लक्षात घेता व्याकरणकारांनी लिहिलेल्या व्याकरणात एक अंतर्गत सुसंगती दिसून येते. मराठी व्याकरणाची परंपरा निर्माण करण्यात या सगळ्या व्याकरणकारांचा मोलाचा वाटा आहे. व्याकरण परंपरेला सुदृढ करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या विचारातून केला. तसेच शालेय पातळीवरील पुस्तके, व्याख्यानमालांच्या(कै. न. चिं. केळकर, इतिहासाचार्य राजवाडे) निमित्ताने, नियतकालिकातून (मराठी संशोधन पत्रिका, भाषा आणि जीवन) येणाऱ्या लेखांनी मराठी व्याकरण लेखनाच्या परंपरेला हातभार लावला.